-13-

13

शासकीय जमीन
राज्य शासनाच्या इतर विभागाकडे
हस्तांतर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
परिपत्राक क्रमांक-जमीन ४९७९/२११०४-
सीआर-५३४-ग-८[३]
मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक : १० मार्च, १९८६.

वाचावे :- १] शासन परिपत्राक महसूल व वनविभाग, क्रमांक : एलएनडी १०७१/ १८३७३६-अे[दोन], दिनांक ९-९-१९७१.

(581) २] शासन परिपत्राक महसूल व वनविभाग, क्रमांक : एलएनडी १०७१/ १८३७३६-अे, [दोन], दिनांक २५-२-१९७२.

परिपत्राक :- वर क्रमांक [१] व [२] येथे नमूद केलेल्या शासन परिपत्राकातील सुचनानुसार शासकीय जमीन राज्य शासनाच्या इतर विभागांना, त्या विभागाच्या प्रयोजनांसाठी हस्तांतर करण्यास जिल्हाधिकारी सक्षम आहेत. अशा प्रकारे राज्य शासनाच्या इतर विभागांकडे हस्तांतर करावयाची शासकीय जमीन जर महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३, पोट कलम [१] अन्वये स्थापन करण्यात आलेल्या महानगर प्रदेशातील असेल तर सदर जमीन हस्तांतर करण्यास महाराष्ट्र जमीन महसूल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे] नियम, १९७१ मधील नियम ५० अन्वये शासनाची पूर्व मंजूरी प्राप्त करुन घेण्यासाठी त्याबाबतचे प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे किंवा काय हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्याबाबत आता असा खुलासा करण्यात येत आहे की, महानगर प्रदेशातील अशी शासकीय जमीन राज्य शासनाच्या अन्य विभागांना ज्या प्रयोजनांसाठी हस्तांतरीत करावयाची आहे ती प्रयोजने जर प्रादेशीक नगररचना योजनेतील जमिनीच्या वापराशी सुसंगत असतील तर त्या जमिनीच्या प्रस्तावीत हस्तांतरास महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे] नियम, १९७१ मधील नियम ५० अन्वये शासनाच्या पूर्वमंजूरीची आवश्यकता नाही. अर्थातच तशी पूर्वमंजूरी प्राप्त करुन घेण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारच्या प्रकरणात जिल्हाधिका-यांनी स्वत:च्या स्तरावरच वर क्रमांक [१] व [२] येथे नमूद केलेल्या शासन परिपत्राकातील सूचनानुसार निर्णय घ्यावा. मात्र महानगर प्रदेशातील शासकीय जमिनीचे राज्य शासनाच्याच, अन्य विभागास असे हस्तांतर करण्यापूर्वी जिल्हाधिका-यांनी संबंधीत सहाय्यक संचालक, नगररचना यांचेकडे संदर्भ करुन हस्तांतरीत करावयाची

IV
25-3-86

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-

कृ. मा. प...

जमीन
/ संबंधित विभागाच्या प्रस्तावीत प्रयोजनासाठी वापरता येईल याबाबत खात्री करून घ्यावी व मगच जमीन हस्तांतर करण्याबाबतचे आदेश काढावेत.

२. हे परिपत्रक नगरविकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ वि. ज. बोरकर ]
उप सचिव,
महसूल व वन विभाग.